गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

दैनिक
# झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

वर्ष :३ रे | अंक १९ | गुरुवार दि.०३/०३/२०२५ | पाने ४ | किमत ४ रु | POSTAL Reg.No.CSN/RNP/537/2024-2026

*** सुविचार ***

आज खूप दिवसांनी मन
भरून रडावं वाटलं
मनातलं सार दु:ख
डोळ्यांढारे
मोकळं करावं वाटलं
कारण कुणाला कितीही
जीव लावा
कुणीच कोणाचं नसत

## ...अन् रात्री 2.30 वाजता संसदेत बहुमताने मंजूर झालं वक्फ सुधारणा विधेयक




संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी सादर केलेले वक्फ दुरूस्ती विधेयक 2025, बहुमताने मंजूर झाले आहे. 12 तासांच्या चर्चेनंतर मध्यरात्र उलटून गेल्यावर रात्री अडीच वाजण्याच्या आसपास हे विधेयक लोकसभेमध्ये मंजूर करण्यात आलं. भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सदर विधेयकाची गरज काय आहे यासंदर्भात बोलताना आपली बाजू ठोसपणे मांडली. त्यांनी विरोधकांनी उपस्थित केलेला 'मुस्लिम-विरोधी' विधेयक या युक्तिवादाविरोधात आपली भूमिका स्पष्ट केली. विरोधकांनी या विधेयकामध्ये सुचवलेले सर्व बदल फेटाळल्यानंतर आवाजी मतदानाने विधेयक मंजूर करण्यात आलं. विधेयकाच्या बाजूने 288 ते विरोधात 232 मतं पडली. लोकसभेत मंजूर झाल्यानंतर हे विधेयक आज राज्यसभेच्या पटलावर ठेवलं जाणार आहे.

**...म्हणून अल्पसंख्यांक भारतात सुरक्षित**

किर्व रिजिजू यांनी, अल्पसंख्यांकासाठी भारताइतकी दुसरी कोणतीही सुरक्षित जागा नाही. अल्पसंख्यांक येथे सुरक्षित आहेत कारण येथील बहुसंख्य समाज हा पूर्णपणे धर्मनिरपेक्ष आहेत, असं म्हटलं. अगदी पारसी समाजासारखा समाजही भारतामध्ये अत्यंत सुरक्षित असून सर्वच अल्पसंख्याक येथे अभिमानाने राहतात, असं रिजिजू यांनी म्हटलं. काही सदस्यांचं म्हणणं आहे की भारतात अल्पसंख्यांक सुरक्षित नाहीत. हे विधान पूर्णपणे चुकीचं आहे. अल्पसंख्यांकासाठी भारताइतकी दुसरी कोणतीही जागा नाही. मी सुद्धा अल्पसंख्याक समाजातून येतो. इथे आपण सर्वजण कोणत्याही भिती शिवाय आणि अभिनामाने राहतो," असं रिजिजू म्हणाले.

काँग्रेस पक्ष या कायद्याचा तीव्र विरोध करतो कारण...: राहुल गांधी "वक्फ (दुरुस्ती) विधेयक हे मुस्लिमांना डावलण्याचे आणि त्यांचे वैयक्तिक कायदे, मालमत्ता अधिकार हिरावून घेण्याचे एक शस्त्र आहे. आरएसएस, भाजप आणि त्यांच्या सहयोगींनी संविधानावर केलेला हा हल्ला आज मुस्लिमांना लक्ष्य करून केला जात आहे परंतु भविष्यात इतर समुदायांना लक्ष्य करण्यासाठी यामधून एक आदर्श निर्माण होतोय. काँग्रेस पक्ष या कायद्याचा तीव्र विरोध करतो कारण तो भारताच्या कल्पनेवर हल्ला करतोय. धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या कलम 25 चे हे उल्लंघन आहे," असं विरोधीरपक्ष नेते राहुल गांधींनी आपल्या एक्स अकाऊंटवरुन म्हटलं आहे.

हा मुस्लिमांवरील हल्लाः ओवेसी "हा मुस्लिमांवर हल्ला आहे.... हा हल्ला मोदी सरकारचा आहे... माझ्या मशिदींना लक्ष्य केले जात आहे," असं 'ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन' (AIMIM) पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी चर्चेदरम्यान म्हटलं आहे. महात्मा गांधीप्रमाणे मी या विधेयकाची प्रत फाडून हे विधेयक संविधानाच्या नियमांमध्ये बसणारं नसल्याचं म्हणतोय, असं सांगत ओवेसींनी विधेयकाची प्रत संसदेमध्येच फाडली. "या देशामध्ये भाजपाला मंदिर आणि मशिदींच्या नावाखाली वाद निर्माण करायचा आहे," असंही ओवेसींनी सत्ताधाऱ्यांवर टीका करताना म्हटलं.

## यावल येथील पांडुरंग सराफनगर मध्ये नवीन ढापा करणेची मागणी केली शिवसेनेने.




यावल दि.१ (सुरेश पाटील) येथील पांडुरंग सराफनगर फैजपूर रोड येथील रस्त्यावरील ढापा नवीन करणे बाबतची मागणी शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) केली आहे.दि.१ एप्रिल २०२५ रोजी यावल नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,यावल येथील फैजपूर रोडवरील पांडुरंग सराफ नगर मधील मुख्य प्रवेश रस्त्यावर अनेक वर्षापासून ढापा तुटला आहे. त्या रस्त्यावरून मोठी वर्दळ सुरू असते दुचाकी चार चाकी जाणारी येणारी वाहने,पायदळ चालणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होतो अनेक वेळा या ठिकाणी किरकोळ अपघात होऊन अनेक जण जखमी झालेले आहेत याबाबत नगर परिषदेकडे तोंडी सूचना करून देखील ढाप्याची दुरुस्ती झालेली नाही.तरी या ढाप्याची तात्काळ दुरुस्ती किंवा नवीन मजबूत असा ढापा तात्काळ करावा अन्यथा या परिसरातील नागरिक व शिवसेना तीव्र आंदोलन छेडणार असा इशारा शहर प्रमुख जगदीश कवडीवाले,शहर उपप्रमुख संतोष धोबी,तालुका उपप्रमुख शरद कोळी,शहर उपप्रमुख योगेश चौधरी,शहर उपप्रमुख योगेश राजपूत,आदिवासी सेना तालुकाप्रमुख हुसेन तडवी,शहर उपप्रमुख निलेश पाराशर यांनी केली आहे.

## परराज्यातील सर्कस कलाकार आणि विनापरवाना तांदुळ विक्रेत्यावर कारवाई करण्याची पो . स्टे . ला तक्रार

तळणी:- (पंजाबराव सुर्यवंशी ) हदगाव तालुक्यातील शिरड येथे यार पाच दिवसा पूर्वी बालाजी सर्कस चा कार्यक्रम तीन दिवस होता , सदर सर्कस परराज्यतील रेणगुंटा आंध्रप्रदेश राज्यातील असून सदर सर्कस मध्ये लहान - लहान मुले , लहान बाळाची आई जीवघेणी कसरत करीत असून , महिलेच्या अंगावरून दुचाकी घालणे , जिवंत समाधी घेणे हे प्रयोग जिवघेणे असून सर्कस दरम्यान दुर्घटना घडली तर याला जवाबदार कोण ? तर सदर सर्कस वाले ग्रामस्थांना पैसे ' धान्य मांगत असून ज्यांनी नाही दिले अशांना बेईज्जत करून अपमानीत करीत आहेत . या ग्रामस्थ भयभीत झाले असून सदर सर्कस चालकांनी ग्रामपंचायत ची परवानगी घेतली नाही . पंजाब राज्यातील काही लोकं टेम्पो घेऊन तांदुळ विक्री करीता प्रत्येक गावात फिरून विक्री करीत आहेत . सदर तांदुळ निकृष्ट दर्जा चा असून सदर तांदळाची अन्न व औषध प्रशासनाची कुठलीच परवानगी नाही . सदर तांदुळ विक्रेते ग्रामस्थांना दमदाटी करीत आहेत . परराज्यातील सर्कस चे कार्यक्रम आणि परराज्यातील तांदुळ विक्रेत्यांना गावात फिरू देऊ नये आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची लेखी तक्रार शिरड येथील विश्वनाथ भाऊराव फाळेगावकर यांनी हदगाव पोलिस स्टेशन ला केली आहे .

## सरदार पटेल विद्यामंदिरात इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना दिला निरोप

### विद्यार्थ्यांनी केलेल्या मनोगताने उपस्थितांनी केले कौतुक....

### पहिल्यांदाच झाला बालकांचा निरोपाचा कार्यक्रम...




जळगाव / हमीद तडवी

रावेर तालुक्यातील ऐनपुर येथील सरदार वल्लभभाई पटेल पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यामंदिरात इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संस्थेचे संचालक तथा बलवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक एन व्ही पाटील सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.प्रास्ताविक मुख्याध्यापक अक्षय पाटील यांनी केले.सरस्वती पुजन व दिपप्रज्वलन व्यवस्थापक आर टी महाजन सर यांनी केले.यावेळी शाळेतील १८ विद्यार्थ्यांनी शाळेला निरोप देताना आपल्या विचारातुन शाळेतील गुरुजनांचा उल्लेख करत घेतलेल्या विविध कार्यक्रमांसह अभ्यासाबद्दल अनुभवांना उजाळा दिला व आठवण म्हणून छोटी भेट वस्तु मुख्याध्यापकांकडे दिली.अध्यक्षीय विचारात एन व्ही पाटील यांनी जीवनाला आकार देण्यासाठी व उंच भरारी घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करावा त्या शिवाय यश मिळु शकत नाही.आत्मविश्वास व मेहनतीनेच यश जवळ येत असते.आपल्या गुरुजनांसह आपल्या आई वडिलधारी व्यक्तींचा नेहमी आदर ठेवावा असे विचार मांडलेत.सुत्रसंचालन निकिता चौधरी यांनी तर आभार जयश्री सराफ यांनी केले.यासाठी वैष्णवी महाजन,कविता बोदडे,श्रद्धा बारी,अश्विनी चौधरी,किरण चौधरी यासह शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सावरपाड्यात नाथभक्तांचा गुढीपाडवा महोत्सव



चंद्रकांत देसले /शहापूर प्रतिनिधी

शहापूर तालुक्यातील गोरख भक्तीधाम नवनाथ मंदीर सावरपाडा येथे सुमारे ५ हजार नाथभक्तांचा गुढीपाडवा महोत्सव संपन्न झाला. गोरख भक्तीधाम मंदिराचा प्रथम वर्धापनदिन व मानाची काठी पालखी सोहळा हे औचित्य साधत या महोत्सवाचे आयोजन नाथभक्त शिवाजी भेरे व नाथभक्त परिवार शहापूर, मुरबाड, वाडा, भिवंडी तालुका यांनी केले होते. रविवारी (दि.३०) रोजी सकाळी अभिषेकाने चोंढे येथे गुढीपाडवा महोत्सवाला सुरुवात करण्यात आली होती.मानाची काठी चोंढे, साकुर्ली, हेदवली येथे पालखीने फिरवत सावरपाडा येथे गोरख भक्तीधाम मंदिरात आणण्यात आली. रात्री महाआरती, मान्यवरांचा सन्मान, महाप्रसाद, नाथ गीतांचा कार्यक्रम व गोंधळ अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात होते. यावेळी चारही तालुक्यांतील सुमारे ५ हजार नाथभक्त उपस्थित होते.

## वच्छलाबाई देशमुख यांचे निधन



तळणी :- ( पंजाबराव सुर्यवंशी ) हदगाव तालुक्यातील उंचेगाव ( बु ) येथील वच्छलाबाई आबासाहेब देशमुख यांचे अल्पशा आजाराने २ एप्रिल बुधवार रोजी दुपारी तीन दहा वाजता निधन झाले . मृत्यू समयी त्या ७१ वयाच्या होत्या , त्यांच्या पश्चात पती , मुलगा , सून , मुलगी , जावई ,नातू असा परीवार आहे. त्यांच्या पार्थिवावर ३ एप्रिल गुरुवार रोजी सकाळी ९:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत .

## आनंदीबाई गोरठेकर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री जी.पी. जाधव यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न

उमरी प्रतिनिधी : मनोज पाटील

तालुक्यातील गोळेगाव येथील आनंदीबाई गोरठेकर हायस्कूल चे मुख्याध्यापक श्री गंगाधर पोमा जाधव सर हे नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्याने 1 एप्रिल रोजी त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी

युवा नेते शिरीष देशमुख गोरठेकर (लालबहादूर शिक्षण संस्था सचिव) सोहळ्यानिमित्त शुभेच्छा देताना

युवा नेते कैलास देशमुख गोरठेकर( नूतन सेवाभावी संस्था सचिव), राजेश्वर वंगलवार, श्री पांचाळ सर ( मुख्याध्यापक जि.प. शा गो) श्री पाटील सर ( केंद्रप्रमुख) गंगाधर देशमुख ( से. नि.वि.अ) रामचंद्र पाटील जाधव (से.स. सो. चेगरमन) गोविंद पाटील जाधव, राघोजी पाटील जाधव देविदास मुंडफळे ( मा. सरपंच), नितीन कांबळे संस्थेचे सर्व संचालक व शिक्षक वर्ग उपस्थित होता . यावेळी अनेक शाळेचे माजी विद्यार्थी यांनी जाधव सरांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. शालेय जीवनामध्ये शिकत असताना सरांन कडून यशस्वी जीवन जगण्याचे अनेक धडे शिकलोत. त्याच बरोबर सरांचा मनमिळाऊ स्वभाव शिकण्यास प्रेरणा देत होता असे त्यांच्या तोंडून ऐकण्यास मिळाले. त्यातील काही माजी विद्यार्थी शिक्षक होते तर काही भारतीय सैन्यामध्ये सैनिक म्हणून होते.

उत्सव मूर्ती यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्था संस्थेचे विश्वस्त सहकार्य अध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाल्याने संस्थेतील माझा सर्व कार्यकाळ फारच आनंदी होता असे सांगून सगळ्यांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दुधे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन साबदे सर यांनी केले.



## शिल्लेगाव पोलिसांचा अभिनव कार्यक्रम...

### शिल्लेगाव पोलिसांच्यावतीने शीरखुर्मा पार्टी संपन्न......

**शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या इतिहासात सर्वप्रथम शीरखुर्मा पार्टीचे आयोजन......**

आत्तापर्यंतच्या शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या इतिहासात दरवर्षी रमजान महिन्यात इतर पार्टीचे आयोजन केले जात होते मात्र यावर्षी हा पायंडा पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी रद्द करून रमजान ईदनंतर शिरखुर्मा पार्टीचे आयोजन केले ते योग्य झाले कारण उपवासानंतर प्रत्येकजण शिरखुर्मा पार्टीचा आस्वाद घेऊ शकतो अशी भावना प्रत्येकाची होती.

**सलीम चाऊस (पोलिस निरीक्षक, शिल्लेगाव )**

रमजान ईद म्हणजे ईद-उल-फित्र, हा सण इस्लाम धार्मियांत पवित्र मानला गेला असून हा सण रमजान महिन्याच्या शेवटी साजरा केला जातो. या सणाला 'छोटी ईद' असेही म्हणतात रमजान ईद, उपवासाचा महिना संपतो आणि शव्वाल या नवीन महिन्याचे स्वागत करणारा सण आहे ईद-उल-फित्र, ज्याला उपवास तोडण्याचा सण म्हणूनही ओळखले जाते त्यामुळे उपवासाच्या महिन्यात इफ्तार पार्टी करण्याचे ऐवजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शीरखुर्मा पार्टीचे आयोजन करण्यात आले त्यामुळे हिंदू मुस्लिम व इतर धर्मीयही ह्या शीरखुर्मा पाटील सहभागी झाले याचा मनस्वी आनंद झाला.

वैजापूर प्रतिनिधी अर्जुन शिंदे

पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांनी स्वतः बनऊन घेतला शिरखूर्म्यासाठी लागणारा मसाला.....

तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्यावतीने बुधवारी 2 एप्रिलला शीरखुर्मा पार्टीचे आयोजन केले होते सकाळी 11 वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम संध्याकाळी साडेचार वाजेपर्यंत चालला. दरम्यान छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील प्रत्येक पोलीस ठाण्याच्यावतीने ग्रामीण पोलीस अधीक्षक,अप्पर पोलीस अधीक्षक उपविभाग पोलीस अधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली मुस्लिम धार्मियांच्या पवित्र असलेल्या रमजान महिन्यात इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते मात्र शिल्लेगांव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्लेगांव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पत्रकार, पोलीस पाटील, समाजसेवक,तंटामुक्ती अध्यक्ष, सरपंच उपसरपंच



ग्रामपंचायत सदस्य, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी,गृहरक्षक दलाचे जवान,पोलीस बांधव, महिला दक्षता कमिटीचे सदस्य, यांच्यासाठी बुधवारी 2 एप्रिल ला रमजान ईद झाल्यानंतर शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या वतीने शीरखुर्मा पार्टीचे आयोजन केले होते विशेष म्हणजे शीरखुर्मासाठी लागणारा कच्चा मसाला पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी स्वतः घरी बनवला होता उशीर खुरमा बनवतानाही स्वतः जागेवर थांबून शीरखुर्मा बनवून घेतला त्यामुळे शीरखुर्मा व अल्पहार अत्यंत चविष्ट झाला होता सकाळी अकरा वाजेपासून सुरू झालेल्या या कार्यक्रमाचीं सायंकाळी साडेचार वाजता सांगता झाली आलेला प्रत्येक यजमान चाखलेल्या शीरखुर्मा व रुचकर असलेल्या गुलगुले यांच्या चवीची प्रशंसा करत होता.

## साईकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चे थाटात उद्घाटन...

### डॉ. माधव भुरके यांचा पुढाकार...


संतोष डवरे, तामसाः- सध्या शहराकडे जाणाऱ्याचा ओघ वाढलेला असून, खेड्याकडे कोणीही यायला धजावत नाही. असे असतानाही तामसा सारख्या ग्रामीण भागात रुग्णालय उघडण्यास मोठं धाडस लागत आणि ते धाडस डॉ माधव भुरके आणि त्यांच्या टीम ने



केले आहे असे प्रतिपादन हिंगोली लोकसभेचे विद्यमान खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर उद्घाटन प्रसंगी बोलताना व्यक्त केले. यावेळी, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, आदी उपस्थित होते. तर डॉ. माधव भुरके, डॉ.बळीराम भुरके, डॉ. शिवप्रसाद लखपत्रे,डॉ. प्रविण पा. रिट्टेकर,डॉ. रविकिरण बाचेवाड डॉ. उत्तम वागतकर,डॉ. प्रभा केंकरे (रिट्टेकर) डॉ. सविता बाचेवाड पल्लेवाड आदी वैदकिय सेवा देणारे तज्ञ डॉ. उपस्थित होते. या प्रसंगी आंध आदिवासी समाज संघटनेचे अध्यक्ष अड.रामदास डवरे, माजी उप सभापती शंकरराव मेंडके, आफ्रोट कर्मचारी संघटनेचे

"गरोदर स्त्रीयासाठी सोनोग्राफीची सेवा,प्रशस्त व सुसज्ज प्रसुतीगृह,गर्भाशय व गर्भाशयावरील गाठ काढण्याची शस्त्रक्रीया,बाळ नसलेल्या दापत्यांसाठी वंधत्व निवारण उपचार, मासिक पाळी संबंधित सर्व आजारांवर उपचार,शुगर,बि.पी. दमा. ई. आजारावर उपचार, ई. सी. जी. सुविधा,डेंगू, मलेरिया,हायड्रोसिल, अपेंडिक्स, हर्निया या आजांवरील उपचार व ऑपरेशन उपलब्ध, मुळव्याध, भगंदर, फिशर ऑपरेशन, स्तनाच्या गाठी काढण्याची शस्त्रक्रीया , आदी सेवांचा परिसरातील रुग्णांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी डॉ. माधव भुरके यांनी केले आहे.

सचिव डॉ.डी.डी.गायकवाड,डॉ. दीपक नाईक, डॉ.मारोती वाकोडे, डॉ.नंदा वाकोडे, डॉ. धुमाळे, डॉ. वावधने गजानन, डॉ. प्रिती वावधने डॉ. नारायण डाखोरे, डॉ. शेळके, डॉ. संदिप कारंजकर,माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष राठोड, माजी पंचायत समिती सदस्य संदीप राठोड,सरपंच आनंदराव घंटलवार,माजी सरपंच बालाजी महाजन, नामदेव बाऊलकर, पत्रकार रामराव मोहीते, अंकुश मिराशे, शिवाजी सूर्यवंशी ,रामराव मिराशे, श्रीरंग देशमखे,माजीद पठाण, अशोक हुरदुके, ,उपस्थित होते. पुढे बोलताना श्री अष्टीकर म्हणाले की, तामसा सारख्या आदिवासीबहुल ग्रामीण भागात, एकाच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध होत असल्याने ही जमेची बाजू आहे. सध्या ग्रामीण भागातील महिलांमध्ये प्रमाण वाढले असून, नांदेड सारख्या ठिकाणी महिला रुग्ण जाण्यास टाळाटाळ करतात. आता ग्रामीण भागातच ही सेवा प्रदान होण्याने डॉ. माधव भुरके व सर्व टीम कौतुकास पात्र ठरते असे आष्टीकर यावेळी म्हणाले. तर माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी भुरके यांचे आरोग्य सेवेतील दिलेले योगदानाचे कौतुक करत पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बळीराम भुरके यांनी केले तर आभार माजी उपसभापती शंकर मेंडके यांनी मानले.





# RBI च्या डेप्युटी गव्हर्नरपदी पूनम गुप्ता यांची नियुक्ती

जागतिक बँकेच्या माजी अर्थतज्ज्ञ पूनम गुप्ता यांची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर पदी नियुक्ती करण्यात आली आहे. ७ ते ९ एप्रिल दरम्यान होणार्या द्वैमासिक चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीपूर्वी ही नियुक्ती करण्यात आली. पुढच्या तीन वर्षांच्या कालावधीसाठी त्या या पदावर असणार आहेत. मायकल पात्रा सध्या या पदावर आहेत.



जागतिक बँकेत २० वर्षांचा अनुभव पूनम गुप्ता सध्या नॅशनल कॉऊन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च (NCAER) च्या महासंचालक म्हणून काम पाहतात. त्या पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्या आहेत आणि १६ व्या वित्त आयोगाच्या सल्लागार परिषदेच्या संयोजक म्हणून काम करतात. पूनम गुप्ता २०२१ मध्ये एनसीएईआरमध्ये सामील झाल्या, त्यांच्यासोबत वॉशिंग्टन डीसी येथे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) आणि जागतिक बँकेत वरिष्ठ पदांवर जवळजवळ दोन दशकांचा अनुभव आहे. शिवाय, गुप्ता यांनी मेरीलँड विद्यापीठ (यूएसए) च्या दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये अध्यापनाची पदे भूषवली आहेत आणि दिल्लीतील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट (ISI) मध्ये व्हिजिटिंग फॅकल्टी सदस्य म्हणून काम केले आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड पॉलिसी (NIPFP) मध्ये RBI चेअर प्रोफेसर आणि इंडियन कॉऊन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स (ICRIER) मध्ये प्रोफेसर म्हणूनही त्यांनी काम केलंय. शिवाय, गुप्ता NIPFP आणि ग्लोबल डेव्हलपमेंट नेटवर्क (GDN) च्या बोर्डवर पदांवर आहेत आणि Poverty and Equity आणि The World Development Report या जागतिक बँकेच्या सल्लागार गटांच्या सदस्य आहेत.

**अनेक वित्तीय संस्थांवर कार्यरत**

त्या NITI आयोगाच्या विकास सल्लागार समितीचा देखील भाग आहेत आणि FICCI च्या कार्यकारी समितीवर काम करतात. उल्लेखनीय म्हणजे, भारताच्या G20 अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी मॅक्रोइकॉनॉमिक्स आणि ट्रेडवरील टास्क फोर्सचे अध्यक्षपद भूषवले. NCAER मध्ये, गुप्ता आर्थिक वाढ, आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणाली, केंद्रीय बँकिंग, मॅक्रोइकॉनॉमिक स्थिरता, सार्वजनिक कर्ज आणि राज्य वित्त यासारख्या प्रमुख क्षेत्रांवर कार्य करत आहेत. गुप्ता यांनी अमेरिकेतील मेरीलँड विद्यापीठातून अर्थशास्त्रात पीएचडी आणि पदव्युत्तर पदवी घेतली आहे. तसेच दिल्ली विद्यापीठातील दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी घेतली आहे. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रावरील डॉक्टरेट कार्यासाठी त्यांना १९९८ मध्ये एक्झिम बँक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## महाबळेश्वर पर्यटन महोत्सव बोधचिन्हाचे अनावरण

मुंबई : राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन विभागाच्या वतीने २ ते ४ मे दरम्यान तीन दिवस महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे 'महाबळेश्वर पर्यटन महोत्सवा'च्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. प्रेक्षणीय स्थळे, स्थानिक कला, संस्कृती, खाद्यसंस्कृतीची ओळख पर्यटकांना व्हावी तसेच या माध्यमातून पर्यटनवृद्धी व्हावी हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. या महोत्सवात स्थानिक लोकसंस्कृतीचा समावेश असलेले कार्यक्रम, नामांकित कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्ट्रॉबेरी व कृषी पर्यटन महोत्सवाचे आयोजन, महाबळेश्वर परिसरातील पाचगणी, कास पठार, कोयनानगर, तापोळा, गड-किल्ले दर्शन व इतर पर्यटन स्थळ, दर्शन सहलीचे आयोजन, पर्यटकांसाठी विविध श्रेणीच्या तंबू निवासाची उभारणी करण्यात येणार आहे.

====================

## राज्यात 537 बालकांना हक्काचे घर

मुंबई: राज्यातील ५३७ बालकांना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हक्काचे पालक व घर मिळाले आहे. राज्याने यंदा दत्तक प्रक्रियेत देशात अव्वल स्थान पटकावले असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. देशात एकूण कायदेशीर दत्तकमुक्त बालकांची संख्या ४५१२ इतकी आहे. राज्यात ५३७ बालके कायदेशीर दत्तकमुक्त करण्यात आली आहेत. या दत्तक प्रक्रियेद्वारे हक्काचे आई-वडील व कुटुंब मिळवून देण्यात आली आहेत. सातत्याने काम करून दत्तक प्रक्रियेमध्ये राज्य देशात अव्वलस्थानी आणल्याबद्दल महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी स्त्रोत संस्थांचे अभिनंदन केले आहे.

## गुजरातमध्ये फटाक्यांच्या गोदामात स्फोट; २१ ठार

गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यात फटाक्यांच्या गोदामाला लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. दिसा शहराजवळील औद्योगिक वसाहतीत सकाळी पावणेदहाच्या सुमारास ही घटना घडली. मृतांमध्ये बहुसंख्य मध्य प्रदेशचे आहेत. घटनेनंतर स्लॅब कोसळल्याने मृतांचा आकडा वाढल्याचे पोलीस अधीक्षक अक्षयराज मकवाना यांनी सांगितले. हे फटाक्यांचे गोदाम असले तरी त्यांची निर्मिती येथे होत होती याचे पुरावे नसल्याचे मकवाना यांनी नमूद केले. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले.

## वैद्याकीय परिषदेची आज निवडणूक जिल्ह्यातील शासकीय रुग्णालय येथे मतदान केंद्र

पालघर : महाराष्ट्र वैद्याकीय परिषदेच्या निवडणुकीसाठी पालघर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालय येथे मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी गुरुवार ३ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार असल्याचे जिल्हा माहिती कार्यालयाकडून जाहीर करण्यात आले आहे. उपजिल्हाधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र हजारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या निवडणुकीत एकूण ४१ उमेदवार निवडणूक लढवत असून त्यापैकी ९ सदस्य निवडण्यात येणार आहेत. वैद्याकीय परिषदेकडे १७ जानेवारीपर्यंत नोंदणी केलेल्या नोंदणीकृत वैद्याकीय व्यावसायिकांनी व नोंदणीचे नूतनीकरण केलेल्या व्यावसायिकांच्या नावांचा समावेश मतदार यादीत आहे. पालघर जिल्ह्यासाठी निश्चित केलेले १०४३ मतदार आहेत. निवडणुकीच्या मतदानासाठी, मतदार यादीत ज्यांचे नाव समावेश करण्यात आले आहे असे सर्व वैद्याक व्यवसायी व्यक्तिश: मतदान करतील आणि मतदारांची ओळख पटविण्यासाठी महाराष्ट्र वैद्याकीय परिषदेने दिलेले नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र किंवा निवडणूक आयोगाने मान्यता दिलेली ओळखपत्रे दाखवावी लागतील.

# शांतता समिती सभेत सामाजिक एकात्मतेचा संदेश



जळगाव जामोद : आगामी रामनवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर जळगाव जामोद, सोनाळा व संग्रामपूर पोलिस ठाण्याच्या वतीने दि. ३० मार्च रोजी स्थानिक सांस्कृतिक भवन येथे शांतता समितीची सभा पार पडली. अध्यक्षस्थानी पोलिस अधीक्षक विश्व पानसरे तर मार्गदर्शक म्हणून अपर पोलिस अधीक्षक (आयपीएस) डॉ. श्रणिक लोढा उपस्थित होते. यावेळी पोलिस उपअधीक्षक कारखेले, जळगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार श्रीकांत निचळ, तामगाव पोलिस ठाण्याचे ठाणेदार राजेंद्र पवार, सोनाळा पोलिस ठाण्याचे ठाणेदार चंद्रकांत पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. जाधव व नगरपरिषदेचे कदम उपस्थित होते.

सण-उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन सभेची सुरुवात जळगाव पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या प्रास्ताविकाने झाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रसन्नजित पाटील, शिवसेनेचे दत्ता पाटील, अभय मारोडे, अजय वानखडे, गफार भाई यांनी मनोगत व्यक्त केले. अधीक्षक पानसरे यांनी उपस्थितांना कायद्याचे पालन करून सण व उत्सव शांततेत व एकोप्याने साजरे करण्याचे आवाहन शांतता समितीच्या बैठकीत करण्यात आले. अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. लोढा यांनी सोशल मीडियाच्या गैरवापरासंदर्भात युवांना सावध राहण्याचे आवाहन केले. भडकावू पोस्ट किंवा संदेश प्रसारित केल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. अनिल भगत यांनी संचालन केले, तर उपअधीक्षक कारखेले यांनी आभार मानले. सभेला सर्वपक्षीय नेते, पोलिस अधिकारी, पोलिस पाटील व सरपंच उपस्थित होते.

## शेतीच्या कारणावरून दोन गटात वाद

मोताळा : शेतीच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद होऊन हातात कुऱ्हाड आणि विळा घेऊन जीवे मारण्याची तसेच बंदुकीने उडवून देण्याची धमकी दिल्याची घटना ३० मार्च रोजी संध्याकाळी सुलतानपूर शिवारात घडली. परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही गटांतील दहा जणांविरुद्ध बोराखेडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. कोथळी येथील किशोर पाटील यांनी प्रकरणात तक्रार दिली. त्यांची शेती सुलतानपूर शिवारात आहे. ३० मार्च रोजी संध्याकाळी गावातील गोपाल सातव, मनीष सातव, विवेक सातव, दामोदर सातव, सुधाकर सातव आणि तरोडा येथील नारायण रबडे या सहा जणांनी शेताच्या धुऱ्याच्या कारणावरून वादग्रस्त शेतात ट्रॅक्टर घालून बांध टाकून नांगरणी केली. हटकले असता त्यांनी कुऱ्हाडी आणि विळे हातात घेऊन जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.दुसऱ्या गटातील कोथळी येथील मनीष सातव यांनी पोलिसांत तक्रार दिली. ३१ मार्च रोजी सकाळी ते घरी असताना, गावातील किशोर पाटील, त्यांची पत्नी राधा, मुलगा ऋषिकेश आणि शंतनू घरासमोर आले. "तू माझे शेत का नांगरले?" असे म्हणत शिवीगाळ करून चापट-बुक्क्यांनी मारहाण केली. प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आंब्याची पहिली खेप उद्या सातासमुद्रापार पणन विभागाच्या केंद्रातून निर्यात

नवी मुंबई : गुढीपाडव्यानंतर बाजारात आंब्याच्या आवकेस सुरुवात झाली आहे. आता मुबलक प्रमाणात हापूस उपलब्ध होत आहे. वाशीतील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या प्रमुख निर्यात सुविधा केंद्रात अमेरिकेचे निरीक्षक दाखल झाली असून निरीक्षणाला सुरुवात करण्यात आली आहे. दोन दिवसांमध्ये आंब्यांचे डोज मॅपिंगला (कीड नष्ट करण्याची विशिष्ट प्रक्रिया) करून हिरवा कंदील मिळताच ३ एप्रिल पासून आंबा निर्यातीला सुरुवात होणार आहे. पहिल्या खेपेत जवळ जवळ १०हजार बॉक्स म्हणजे ३०-३५ टन आंब्याची निर्यात होईल अशी माहिती पणन मंडळाने दिली आहे. देशांतर्गत आंब्याची मागणी असते त्याच बरोबर परदेशीही आंब्याला पसंती दिली जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हापूस निर्यात करण्यासाठी त्याचा दर्जा टिकवून ठेवणे हे भूमिका महत्त्वाची असते.

> ४ हजार टन निर्यातीचे उद्दिष्ट आखाती देश, लंडन, ऑस्ट्रेलिया, कुवेत, युरोपियन देश, जपान, साऊथ कोरिया या ठिकाणी निर्यात होते. यंदा राज्य शासनाच्या कृषी पणन मंडळ निर्यात केंद्रातून ४ हजार टन आंब्याची निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून गुरुवारी ३०- ३५ टन आंब्याची पहिली निर्यात होणार आहे.

विविध प्रक्रिया करून, आंब्याची गुणवत्ता तपासणी करून, विशिष्ट तापमान ठेवून दीर्घकाळ टिकण्यासाठी विविध प्रक्रियेतून हापूसला जावे लागते त्यांनतर त्याची निर्यात करण्यात येते. नियमांच्या चौकटीतून आंबा निर्यातीकरीता आंब्याचा आकार, वजन, आणि दर्जा महत्त्वाचा असतो.



# टिप्पर-ट्रॅक्टर अपघातात चालकाचा जागेवरच मृत्यू

## टिप्पर चालकाविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल



जळगाव जामोद : टिप्परने ट्रॅक्टरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात टाकळी पारस्कर येथील ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू झाल्याची घटना दि. २९ मार्च रोजी दुपारी २.३० वाजेच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, कालू बेरवा (रा. लांजुड) हा ट्रॅक्टर क्रमांक (एमएच-२८, एजे-५११२) ने गावी परतत असताना टिप्पर क्रमांक (एमएच-४६, बीबी-००५६) ने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. टिप्पर चालक एकनाथ भोंबे याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालविल्यामुळे हा अपघात झाला. अपघातात गंभीर जखमी झालेल्या कालू बेरवा घटनास्थळीच मृत्यू झाला. यांचा यासंदर्भात कळूभाऊ दशरथ धामोडे (४५, रा. लांजुड) यांनी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५ (अ), १०६ (१) अंतर्गत टिप्पर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून तो सध्या फरार आहे. अपघात एवढा भीषण होता की, टिप्परच्या समोरील दोन्ही चाकांचे तुकडे पडले. पुढील तपास ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव जामोद आहेत. पोलिस करीत.



मलकापुर मध्ये रमजान ईद उत्साहाने साजरी करण्यात आली. या प्रसंगी सर्व हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना मिठी मारून ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि फुले देऊन त्यांचे स्वागत केले. या शुभप्रसंगी मलकापुर चे तहसीलदार राहुल तायडे साहेब मलकापुर चे ठाणेदार गिरी साहेब समतेचे निळे वादळ अशांतभाई वानखेडे, संतोष भाऊ रायपुरे, मिलींद भाऊ डवले शामभाऊ राठी, एडवोकेट जावेद कुरेशी ,समद कुरेशी इत्यादी उपस्थित होते

## पालघरच्या जिल्हाधिकारीपदी इंदुराणी जाखर

मुंबई: राज्य सरकारने मंगळवारी प्रशासनात फेरबदल करताना पालघरच्या जिल्हाधिकारीपदी कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखर यांची तर रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नेहा भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राजेंद्र भारुड यांची विकास आयुक्तपदी, निधी पांडे यांची लघु उद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी, वैष्णवी बी. याची नागपूर महापालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी, भारत बास्टेवाड यांची रोजगार हमी योजना आयुक्तपदी, लक्ष्मी मिश्रा यांची राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सह व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## अभिजात मराठी'साठी लवकरच समिती

मुंबई : मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा प्राप्त झाला असून भाषेच्या संशोधन, विकास आणि उन्नतीसाठी काम करण्यात येत आहे. यासाठी लवकरच एक समिती गठित करण्यात येईल, अशी माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बैठकीत दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक विभागास १०० दिवसांमध्ये पूर्ण करायची उद्दिष्टे दिली आहेत. त्या अनुषंगाने उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा विभागाची मंत्रालयात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस मराठी भाषा विभागाचे सहसचिव दादासाहेब भोसले उपस्थित होते. मराठी पुस्तकांच्या उत्तम मुखपृष्ठासाठी पुरस्कार देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. मराठी भाषा विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा भवन उभारण्याचे काम सुरू आहे. सीमा भागातील गावांमध्ये मराठी भाषेच्या प्रसारासाठी निधीची तरतूद करण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले

## शाळा स्वयंमूल्यांकन माहिती भरण्यासाठी मुदतवाढ

पुणे : राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याअंतर्गत (स्क्वॉफ) स्वयंमूल्यांकनाची माहिती भरण्यासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. मात्र, या स्वयंमूल्यांकनातील १२८ मानकांची माहिती भरणे आणि छायाचित्रे, चित्रफिती जोडण्याच्या कामात शिक्षकांची दमछाक होत असल्याचे चित्र आहे. एससीईआरटीने स्थापन केलेल्या राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षातर्फे राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार केला आहे. त्यानुसार या प्रक्रियेसाठीचा ऑनलाइन दुवा उपलब्ध करून देत शाळांना स्वयंमूल्यांकनासाठीची माहिती भरणे, छायाचित्रे, चित्रफिती जोडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांच्या परिपत्रकानुसार आतापर्यंत राज्यातील सर्व शाळांची ही प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे या प्रक्रियेसाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

================================

## कोकणवासीयांसाठी उन्हाळी विशेष रेल्वेगाडी

मुंबई : उन्हाळी हंगामात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य आणि कोकण रेल्वेच्या वतीने मुंबई ते मडगाव विशेष रेल्वेगाड्या धावणार



आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना उन्हाळी विशेष रेल्वेगाडीचा फायदा होणार आहे. गाडी क्रमांक ०११०४/०११०३ मडगाव ते लोकमान्य टिळक टर्मिनस ते मडगाव जंक्शन साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी धावेल. गाडी क्रमांक ०११०४ मडगाव ते लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी ६ एप्रिल ते ४ मेपर्यंत दर रविवारी सायंकाळी ४.३० वाजता मडगाव जंक्शन येथून निघेल. ही रेल्वेगाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ६.२५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११०३ लोकमान्य टिळक टर्मिनस ते मडगाव साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ७ एप्रिल ते ५ मेपर्यंत दर सोमवारी सकाळी ८.२० वाजता सुटेल आणि मडगाव येथे रात्री ९.४० वाजता पोहोचेल. या रेल्वेगाडीला करमळी, थिवि, सावंतवाडी रोड, कुडाळ, सिंधुदुर्ग, कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, विलवडे, आडवली, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड, माणगाव, रोहा, पेण, पनवेल आणि ठाणे स्थानकावर थांबेल. या रेल्वेगाडीला २० एलएचबी डबे असणार आहेत. द्वितीय श्रेणी वातानुकूलित १ डबा, तृतीय श्रेणी वातानुकूलित ३ डबे, शयनयान ८ डबे, सामान्य ४ डबे, तृतीय श्रेणी इकॉनॉमी २ डबे, जनरेटर कार १ डबा, एसएलआर १ डबा अशी रचना असेल.



दैनिक
# झुंजार जनता



३ गुरुवार दि.०३/०३/२०२५


द•ख•ल

## ओढा खोलीकरण व रुंदीकरणास सुरुवात

**लोणी धामणी :** पहाडदरा (ता.आंबेगाव ) या दुष्काळग्रस्त गावात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजने अंतर्गत पाझर तलाव,ओढा व नाला खोलीकरण व रुंदीकरण कामांची सुरुवात करण्यात आली.जलसंधारण विभाग व टाटा मोटर्स,नाम फाऊंडेशन यांच्या संयुक्तरीत्या पाझर तलाव,ओढा,नाला खोली करण्यास सुरुवात करण्यात आली असून यामुळे पाझर तलाव,ओढा,नाला यामध्ये पावसाचे पाणी साचून त्याचा शेतीसाठी उपयोग होईल. यावेळी सरपंच मच्छिंद्र वाघ, खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष भगवान वाघ,उपसरपंच कैलास वाघ, ग्रामपंचायत सदस्य व मोठ्या संख्येने येथील ग्रामस्थ उपस्थित होते. पहाडदरा हे दुष्काळग्रस्त गाव म्हणून ओळखले जाते.हे गाव पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.त्यामुळे पावसाच्या पाण्यावर येणारी पिके येथे प्रामुख्याने घेतली जातात.या गावाभोवती डोंगराळ भाग असल्याने जर या परिसरात पाझरतलाव,ओढे,नाले यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण केले तर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले जाईल व त्याचा फायदा शेतकर्यांना होईल असे सरपंच मच्छिंद्र वाघ यांनी सांगितले सांगितले.




पहाडदरा (ता.आंबेगाव )येथे ओढा खोलीकरणास व रूंदीकरणास सुरुवात झाली आहे._

## आगीत चार दुकानं जळून खाक ; तिघे किरकोळ जखमी

**पुणे :**-पिंपरी- चिंचवड मध्ये सायंकाळी पाचच्या सुमारास नेहरू नगर येथील झिरो बॉईज चौकात गादी बनवणाऱ्या कारखान्याला आणि फर्निचरच्या दुकानाला भीषण आग लागली. या घटनेत दुकानाच्या वर असलेल्या मारतीतील तिघांना किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींना तातडीने महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आल आहे.शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी वर्तवला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नेहरूनगर मधील झिरो बॉईज चौकात पाचच्या सुमारास भीषण आग लागल्याची वर्दी मिळाली. अग्निशमन दलाची दोन वाहन घटनास्थळी दाखल झाली होती. तसेच तीन व्यक्ती अडकल्याची भीती देखील व्यक्त केली जात होत होती. त्यांना देखील सुखरूप बाहेर काढण्यात आलं. किरकोळ जखमी असलेल्या तिघांना महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आल आहे. आगीच रौद्ररूप बघता एकूण नऊ अग्निशमनची वाहन घटनास्थळी पोहोचली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पाण्याचे फवारे मारण्यात आले. अखेर एक तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश आल आहे. या आगीमध्ये चार दुकानात जळून खाक झाली आहेत. तसेच दुकानाच्या वर असलेल्या इमारतीला झळ पोहचली आहे.






## एनएमएमएस,सारथी परीक्षेत ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र


**कवठे येमाई :** शिरूरच्या पश्चिमेकडे रयत शिक्षण संस्थेची न्यू इंग्लिश स्कूल कवठे येमाई ही एक नामवंत शाळा असून या विद्यालयातील ११ विद्यार्थ्यांनी २०२४/२५ मध्ये घेण्यात आलेल्या एनएमएमएस,सारथी परीक्षेत घवघवीत यश संपादित केले असून हे सर्वजण शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरले आहेत. त्यामुळे विद्यालयाने याही वर्षी उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. शिष्यवृत्ती पात्र सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्राचार्य किसनराव रत्नपारखी,प्राचार्य जगदीश टिकले व सर्वच ग्रामस्थांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या आहेत. पिंजारी नाजिया वजीर, माळवदे श्रेया सोपान हे दोन विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्ती धारक तर रोडे वैष्णवी शशिकांत, भोसले अश्विनी कैलास, पोळ समिक्षा ज्ञानेश्वर, जाधव अन्वेशा हेमंत, वागदरे सुशिल सोपान, बोऱ्हाडे आयुष बाळू,वागदरे सोहम कानिफनाथ, पोळ यश विजय, रोडे कृणाल भरत,बोऱ्हाडे आदित्य शिवाजी, भोर साईराज दीपक हे अकरा विद्यार्थी सारथी शिष्यवृत्ती धारक ठरले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक म्हणून गाडेकर टी. बी.(बुद्धिमत्ता),मुंजावडे एस. डी. (गणित),गायकवाड डी. पी. (सामाजिक शास्त्र),कडडे एच. पी.(विज्ञान),यांचे महत्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाचे प्राचार्य जगदीश टिकले,अविनाश थोरात,व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य,सर्व ग्रामस्थ,पालक कवठे येमाई यांनी अभिनंदन केले आहे.



## फरार आरोपी अटक,पोलिस प्रशासनाचे ऑपरेशन यशस्वी

सोनई :-शनि शिंगणापूर पोलीस स्टेशन येथील तपासावरील ११ जून २०२३ रोजी घडलेल्या गु.र. नं. ११५/२०२३ भा. द. वि.कलम ३९४,३४,१२०(इ) मधील फरार आरोपी किरण मंगेश पवार रा. कुंदेवाडी ता. निफाड जि. नाशिक ग्रामीण हा गुन्हा घडल्यापासून मिळून येत नव्हता. त्यामुळे तांत्रिक व मानवी कौशल्याच्या आधारे सदर आरोपीस आज दि. ०२ एप्रील २०२५ रोजी अटक केली आहे. सदर गुन्हा उघडकीस आणण्यात राकेश ओला , पोलीस अधिक्षक अहिल्यनगर, वैभव कलू बर्मे, अपर पोलीस अधिकारी श्रीरामपूर, सुनील पाटील, शेवगाव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि आशिष शेळके, स. फौ. भागवत, पोहेका मोकाटे, पोहेका घाडगे, पोहेका मुसळे,पो. शि ठुबे, पो. शि. सुपारे,म.पो. शि.गर्जे या पथकाने कामगिरी केली असून सपोनि आशिष शेळके गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

## सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट अध्यक्षपदी अभिषेक शेळके बिनविरोध



**पाबळ :** महाराष्ट्रातील लाखो लोकांच्या भक्तीचे श्रद्धास्थान पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील प्रसिद्ध देवस्थान श्री क्षेत्र सोमेश्वर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी पिंपरी दुमाला गावचे सामाजिक कार्यकर्ते अभिषेक शेळके यांची निवड झाली.

सोमेश्वर देवस्थान ट्रस्टच्या सोमवारी झालेल्या बैठकीत या अगोदरचे अध्यक्ष सुनील अनंथा सोनवणे यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त जागेवरती विश्वस्त मंडळाची चर्चा झाली या विश्वस्त मंडळामध्ये सर्वानुमते अभिषेक शेळके यांची अध्यक्षपदी निवड झाली.

## मिरजगावच्या पायी पालखी सोहळ्याचे श्रीक्षेत्र अक्कलकोटकडे प्रस्थान







**मिरजगाव :** महाराज श्री.स्वामी समर्थ, जयजय स्वामी समर्थच्या जयघोषात मिरजगाव होऊन अक्कलकोट कडे पायी दिंडी पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाले आहे. गेल्या सलग १३ वर्षापासून मिरजगाव येथील श्री.स्वामी समर्थ बहुउद्देशीय प्रतिष्ठान, ट्रस्ट व मिरजगाव ग्रामस्थांच्या सहकार्यातून सालाबादप्रमाणे यंदाही श्री.स्वामी समर्थ प्रगटदिन सोहळ्याचे औचित्य साधून श्री.क्षेत्र मिरजगाव ते श्री.क्षेत्र अक्कलकोट पायी दिंडी पालखीचे मिरजगाव येथून मंगळवारी दि.१ एप्रिल रोजी श्री.क्षेत्र अक्कलकोटकडे प्रस्थान झाले. मिरजगाव शहरातील स्वामी समर्थ मंदिरात महाअभिषेक व पूजा, आरती महाप्रसाद झाल्यानंतर आकर्षक अशा सजावट केलेल्या रथात पालखी ठेवण्यात आली. मंदिरापासून निघालेला पालखी रथ शहरातील बाजारपेठ व मुख्य मार्गावर टाळ मृदंगाचा निनाद अन् श्री.स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थचा जयघोष करत वाजतगाजत आणि फुलांची पुष्पवृष्टी करत निघालेला पालखी सोहळा सकाळी ११.३० वाजेच्या दरम्यान भक्तीमय वातावरणात मार्गस्थ झाला.

यावेळी स्वामींच्या जयघोषाने संपूर्ण मिरजगाव परिसर दुमदुमून गेला होता. या पायी दिंडी पालखी सोहळ्यात टाळकरी, गायक वादक, पंचक्रोशीतील स्वामी भक्तांसह महिला भगिनी, मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्री.क्षेत्र मिरजगाव ते श्री.क्षेत्र अक्कलकोट हा पायी दिंडी सोहळा तब्बल २५० किलोमीटर अंतराचा असून मार्गावरील मुक्कामी ठिकाणी दिंडीतील भाविक भक्तांची ठिकठिकाणी जेवणाची व्यवस्था केली जाते. याकरिता अनेक अन्नदाते योगदान देतात. हा पायी रथ पालखी सोहळा दहा दिवसांमध्ये अक्कलकोट येथे पोहचतो.येथील स्वामींच्या मंदिरात आरती व दर्शन घेतल्यानंतर महाप्रसाद वाटप केले जाते. या पालखी सोहळ्याकरिता श्री.स्वामी समर्थ बहुउद्देशीय प्रतिष्ठान ट्रस्ट, श्री.स्वामी समर्थ भगिनी सेवा मंडळ, प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ विशेष परिश्रम घेतात.

### स्वामीकृपेची अध्यात्मिक शिदोरी !

श्री.स्वामी समर्थ प्रगट दिनानिमित्त सालाबादप्रमाणे मिरजगाव येथून श्री.क्षेत्र अक्कलकोटकडे जाणारा पालखी सोहळा गेल्या सलग १३ वर्षांपासून 'उपासनेला दृढ चालवावे, भुदेव संतांसी सदा लवावे !, सत्कर्म योगे वय घालवावे, सर्वा मुखी मंगल बोलवावे' या उक्तीप्रमाणे सुरू आहे. स्वामींची पालखी परिसरातील भाविकांच्या जीवनामध्ये आत्मानंदाचा प्रसाद देणारी व स्वामीकृपेची अध्यात्मिक शिदोरी आहे.

### 'स्वामी भक्तांची पंगत परंपरा कायम'..

प्रत्येक महिन्याला स्वामी भक्तांची पंगत ठरलेल्या प्रमाणे मिरजगाव येथे करण्यात येत असल्याने गेली अनेक वर्षांपासून सर्व स्वामी भक्त एकत्रित येतात. याचवेळी महाप्रसाद म्हणून शिंपी आमटी अन् चपातीची जेवणावळी असते. सर्वच जण याचा आस्वाद घेतात. मिरजगावकरांची ही परंपरा आजही कायम सुरू आहे..

## 'त्या' घटनेचा व्हिडिओ व्हायरल केल्यास कडक कारवाई : पो.नि. संजय ठेंगे



**राहुरी :** राहुरी शहरात दि. २६ मार्च रोजी बुवा सिंध बाबा तालमीमध्ये छत्रपती शिवरायांच्या अर्ध पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रकार घडला. या घटनेमधील फोटो किंवा व्हिडिओ व्हायरल करून काही नागरिक तरुण या घटनेत संदर्भात व्हिडिओ व फोटो व्हायरल करून समाजामध्ये अशांतता पसरविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे राहुरी पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे समाजामध्ये तेढ निर्माण होत असल्याचे नाकारता येत नाही. व त्या घटनेचा परिणाम होऊन त्याचा उद्रेक होऊ नये म्हणून राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी राहुरी शहरासह तालुक्यातील नागरिकांना आवाहन केले आहे की, कृपया छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी होईल अशा प्रकारचा व्हिडिओ किंवा फोटो कोणीही शेअर करू नये.

सदरच्या व्हिडिओ फोटो अथवा अफवा पसरवणाऱ्या लोकांवर सायबर सेलमार्फत पोलीस प्रशासन अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून असल्याने कोणीही अशा प्रकारच्या व्हिडिओ अथवा फोटो अफवा पसरवू नये असे प्रशासनातर्फे राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्याकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

तसेच या घटने संदर्भात जो कोणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मान होईल असा व्हिडिओ पसरवित असेल तर नागरिकांनी या संदर्भात ताबडतोब राहुरी पोलीस स्टेशनला या घटनेची माहिती देण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी नागरिकांना केले आहे.

## सोनेवाडीचे ग्रामपंचायत अधिकारी दाभाडे यांना पुरस्कार



**कोपरगाव ( वार्ताहर )** तालुक्यातील सोनेवाडी येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून सेवा देत असलेले भानुदास दाभाडे यांना नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेच्या वतीने आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर करण्यात आला. नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेकडून संरक्षणा दरम्यान महाराष्ट्र रत्नं सन्मान सोहळा २०२५ यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल संस्थेच्या वतीने हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. मूळचे येवला तालुक्यातील असलेले दाभाडे यांनी कोपरगाव तालुक्यात आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. सोनारी,देर्डे चांदवड,सोनेवाडी येथे गावचा विकासात भर करण्यासाठी त्यांनी ग्रामपंचायतीच्या प्रशासनासोबत विविध प्रकारचे विकासाभिमुख कामे केले आहेत. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेत संस्थेने त्यांना हा पुरस्कार जाहीर केला आहे.

## गायकांचा पालखी तळावर गाण्यांचा बहारदार कार्यक्रम

**माळशिरस : (प्रतिनिधी)** सासवड व परिसरातील हौशी मंडळींनी एकत्र येऊन निर्माण केलेल्या ''पुरंदर गोल्डन सिंगिंग ग्रुप'' या संस्थेने गुढी पाडव्याच्या निमित्ताने सासवड येथील पालखी तळावर हिंदी मराठी गीतांच्या कार्यक्रमाचे सुंदर सादरीकरण केले. कराओके प्रकारातील या कार्यक्रमासाठी सिनेसंगीत प्रेमी मोठ्या संख्येने हजर होते जुन्या नव्या हिंदी मराठी चित्रपटातील गाणी, द्वंदगीते, अभंग, लावणी अशा स्वरुपातील हा कार्यक्रम तब्बल दोनतासांहून अधिक काळ रसिकांच्या प्रतिसादात उत्तरोत्तर रंगत गेला. या ग्रुपचे राम दहिवाल यांच्या मार्गदर्शनाखाली शरद बोबडे, सतीश वाघोले, ॲड. कैलास बेल्हेकर, शरद पाडसे सोपान गिरमे, शुभांगी महामुनी, वैशाली बसाळे, बापुसो गिरमे या कलाकारांनी विविध रचना सादर करत टाळ्या मिळवल्या. सुजाता गुरव यांनी सुयोग्य सुत्रसंचालन केले.




## कॅबिनेट मंत्री आशिष शेलार यांचा नेवासा येथे सन्मान

नेवासा : (प्रतिनिधी) राज्याचे माहिती व तंत्रज्ञान मंत्री ना.आशिष शेलार हे नेवासा येथे आले असता त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाच्या वतीने महाराष्ट्र राज्य संघटक सचिव राजेंद्र आढागळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार,धामोरी येथील रामदास आढागळे,विमा अधिकारी किशोर गारुळे, भाजपचे डॉ. लक्ष्मण खंडाळे, कृष्णा डहाळे,अमोल कपिले आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादीचे राज्य नेते राजेंद्र आढागळे यांनी विविध प्रश्नांच्या संदर्भात ना. आशिष शेलार यांच्याशी चर्चा केली. आपल्या मागण्यांची दखल घेऊन त्यास न्याय देण्याचे काम केले जाईल



## हिट ॲण्ड रन प्रकरणातील आरोपी अखेर अटक

**पुणे :-** पुण्यातील काळे पडळ येथे मॉर्निंग वॉकला गेलेल्या ४९ वर्षीय सुजितकुमार बसवंतप्रसाद सिंग यांना भरधाव कारने दिलेल्या धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली होती. तर या प्रकरणातील फरार आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. समीर गणेश कड (रा. कडनगर, होलेवस्ती चौक, उंड्री) असे अटक करण्यात आलेल्या आरोपी वाहनचालकाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ुजितकुमार सिंग हे उंड्री परिसरात राहायला असून ते १ एप्रिल रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ॉर्निंक वॉकला गेले होते. त्यावेळी त्यांना एका भरधाव चारचाकी वाहनाने जोरात धडक दिली. या घटनेत सुजितकुमार सिंग यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली, तर घटनास्थळावरून वाहनचालक फरार झाला होता. या प्रकरणातील आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांची पथके रवाना केली होती. तर घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरामधील फुटेजच्या माध्यमातून आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू होते. ाह १२ ुह ५४३४ क्रमांकाची चारचाकी सीसीटीव्ही फुटेजमध्ये जाताना दिसली. त्या चारचाकी वाहनाच्या नंबरवरून आरोपी सचिन गणेश कडपर्यंत पोहोचणे शक्य झाले असून त्याला अटक करण्यात आली आहे. या आरोपीकडे




## समाजाला दिशा देण्याचे काम संत करतात : विशालशास्त्री हाडवळे

**मंचर :** संत समाजाला दिशा देण्याचे काम करतात.संत संगतीत राहून ईश्वराची प्राप्ती तर होते व देवाचे देवत्वही कळते.संत कृपेने गवतालादेखील ब्रम्हरुपाची किंमत येत असते. रंजलेल्या गांजलेल्यात व संताच्या संगतीत देव शोधण्याचा प्रयत्न करा. संतसंगतीत राहून मनुष्य जीवांचा उध्दार करा.काळाची गरज ओळखून राष्ट्राच्या हिताकरिता सर्वांनी आपले अंत:करण विशाल करा. गावातील धार्मिकता,सामाजिकता,एकता संभाळण्याचा प्रयत्न करा गावागावात नवीन मंदिरे उभारण्यापेक्षा गावातील पुरातन मंदिराचा जिर्णोध्दार करुन त्यांची दैनदिन व्यवस्था ठेवा असे आवाहन वेदाचार्य विशालशास्त्री हाडवळे यांनी केले. धामणी (तालुका आंबेगांव) येथील बोल्हाईच्या माळावरील पुरातन ग्रामदेवता बोल्हाई मंदिराच्या जिर्णोध्दार करण्यात आलेल्या बोल्हाईच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व शिखर कलशारोहन हाडवळे व जेष्ठ किर्तनकार, वारकऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. बोल्हाई मूर्तीची व कलशाची आणि मांडवडहाळ्याची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीत''भक्तिवेदान्त वारकरी शिक्षण संस्था व संत एकनाथ महाराज गुरुकुल खंडाळे, रांजणगांव गणपती (तालुका शिरुर) येथील संतोष महाराज खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली या गुरुकुलचे ४० शिक्षार्थी वारकरी टाळ मृदुंगासह याशिवाय समस्त पंचरास मंडळीचा ताफा पारंपारिक वाद्यासह सामील झालेले होते. ज्ञानेश्वरी व गाथा सारख्या अनमोल ग्रंथाचे जीवनात पारायण केल्याने मनुष्याला ज्ञान.वैराग्य व भक्तीची प्राप्ती होते. त्यामुळे प्रत्येकांने जीवनात संतानी निर्मित केलेल्या ग्रंथाचे वाचन करावे.जगाच्या कल्याणासाठी संत हे भूतलावर जन्म घेतात व मानव जातीचा उध्दार करतात संताचे विचार हे समाजाला दिशा देणारे असल्याने संत संगतीत राहून परमार्थ करा असा संदेश हाडवळे महाराज यांनी यावेळी दिला. धामणी ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून गावांतील सर्व पुरातन मंदिरांचा जिर्णोध्दार करुन समाजापुढे चांगला आदर्श ठेवलेला आहे.येथील पुरातन म्हाळसाकांत खंडोबा मंदिर आणि परिसर हा प्रेक्षणीय झालेला असून हे देवस्थान महाराष्ट्रातील जागृत व प्रेक्षणीय स्थान म्हणून लौकीक पात्र असल्याचा गौरव हाडवळे यांनी यावेळी केला. यावेळी ह.भ.प.तान्हाजी महाराज तांबे, शरद बँकेचे माजी चेअरमन आण्णा पाटील जाधव, पहाडदर्याचे सरपंच मच्छिंद्र वाघ, उपसरपंच कैलास वाघ, सागर जाधव, संदीप आळेकर, विठ्ठल बढेकर, शामराव करंजखेले, सुभाष तांबे, कैलास रोडे, श्रीकांत विधाटे, पांडुरंग महाराज बोर्हाडे, राजेश भगत, गणेश पंचरास, शांताराम पंचरास, दिलीप आळेकर, गोरक्षनाथ आमाप, मिलींद शेळके, निलेश करंजखेले, कांताराम तांबे, सुरेश बढेकर, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब लालजी बढेकर व ग्रामस्थ आणि महिला भाविक उपस्थित होते.धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदाचार्य मंदारशास्री क्षिरसागर व प्रमोद देखणे आणि त्यांच्या सहकार्यानी केले.श्री अंबिका भजनी मंडळ पहाडदरा व ढोबळेवाडी जारकरवाडी ( तालुका आंबेगांव) येथीलश्री वडजाई संगित भजनी मंडळ यांचा भजनाचा व दिनेश जाधव यांचा बोल्हाईच्या भक्तिमय गीतांचा देवी जागर करण्यात आला. बोल्हाई मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी योगदान देणार्या देणगीदारांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.




## शेतकरी कुटुंबातील अक्षय बनला दिवाणी न्यायाधीश

**रांजणगाव गणपती -** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश परीक्षेत कारेगाव, ता. शिरुर येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील अक्षय पांडुरंग ताठे याची दिवाणी न्यायाधीश (प्रथम वर्ग) श्रेणीपदी निवड झाली आहे.न्यायाधीश होणारा अक्षय हा गावातील पहिलाच युवक ठरला आहे.जिद्द, चिकाटी,सातत्य आणि अथक परिश्रमाच्या जोरावर मिळविलेल्या घवघवीत यशामुळे पहिल्याच प्रयत्नात न्यायाधीश पदी मानाचा तुरा रोवल्याने अक्षय याचे ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. अक्षयचे पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण पुणे महानगरपालिका शाळेत झाले.सहावी ते दहावीपर्यंत शिरुर येथील विद्याधाम प्रशाला तर येथीलच इंदमल ताराचंद बोरा महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पुर्ण केले.त्यानंतर कायद्याचे शिक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून पुर्ण केले.न्यायाधीश पदासाठी ॲड गणेश शिरसाठ यांचे मार्गदर्शन घेतले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२१ मध्ये झालेल्या परीक्षेत अक्षय पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाला, मात्र मुलाखतीअभावी त्याला संधी मिळाली नाही. परंतू निराश न होता २०२२ च्या न्यायाधीश परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर होऊन त्यात अक्षयची दिवाणी न्यायाधीशपदी निवड झाली.त्याचे वडील पांडुरंग ताठे हे शेती व्यवसाय करत असून, आई मनिषा ताठे ह्या गृहिणी आहेत.अक्षयच्या शिक्षणाविषयी आई वडिलांबरोबरच चुलते गणेश ताठे यांना प्रचंड तळमळ होती.दरम्यान, न्यायाधीशपदी निवड झाल्याने अक्षयचा ग्रामस्थांच्या वतीने नुकताच नागरी सत्कार करण्यात आला.

> आई वडिल आणि चुलते यांचे प्रोत्साहन यामुळे यश मिळाले. तसेच जिद्द, सातत्य अन् चिकाटीच्या जोरावर आत्मविश्वासाने कुठलीही गोष्ट शक्य नसून,प्रयत्न करावे यश हमखास मिळते,हे माझे उदाहरण आहे.ध्येय साध्य झाल्याने मिळालेल्या यशामुळे आनंद आहे
>
> **अक्षय पांडुरंग ताठे – दिवाणी न्यायाधीश ( प्रथम वर्ग).**



अक्षय ताठे.
पोपट पाचंगे, रांजणगाव गणपती.

## कोट्यवधी शेतकऱ्यांना ऑनलाईन सेवेचा फायदा

### महसूल विभागाची डिजीटल क्रांती

**कवठे येमाई :-** महाराष्ट्र शासनाच्या महत्वकांक्षी व शेतकऱ्यांना हितावह ठरलेल्या ई-महाभूमी प्रकल्पातील सन २०२४/२५ या आर्थिक वर्षात डिजिटल स्वाक्षरीत ७/१२, ८ अ खाते उतारे,फेरफार व मिळकत पत्रिका सामान्य नागरिकांनी ऑनलाईन डाउनलोड करून आपली कामे घरी बसून करून घेतली.यामुळे कोट्यावधी शेतकरी,नागरिकांना महसूल विभागाच्या या सेवेचा लाभ घेता येत आहे. महसूल विभागाच्या या डिजिटल क्रांतीतुन शासनाला २०२४/२५ या आर्थिक वर्षात ७६ कोटी ८० लाखांचा महसूल प्राप्त झाल्याची माहिती महसूलच्या या डिजिटल क्रांती चे जनक,पुण्याचे कर्तव्यदक्ष पजिल्हाधिकारी रामदास जगताप यांनी दिली.वर्षभरात सातबारे,आठ अ तत्सम कागदपत्रे मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना तलाठी कार्यालयात जावे लागत असे. व ती कागदपत्रे ही अनेकदा वेळेत मिळत नसत ही बाब लक्षात घेत ई फेरफार प्रकल्पाचे तत्कालीन राज्य समन्वयक व पुण्याचे विद्यमान उपजिल्हाधिकारी रामदास जगताप यांनी यासाठी शासनाकडे डिजिटल संकल्पना मांडत त्यास महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी व सहकाऱ्यांना सोबत घेत सर्वांच्या विचारातून राज्यात इ फेरफार प्रकल्प सुरु केला. राज्यभरातील शेतकऱ्यांकडून या प्रकल्पास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने २०२४/२५ या एका वर्षात डिजिटल स्वाक्षरीत सातबारा ३ कोटी ३ लक्ष ७७ हजार ८७५ डाउनलोड झाले,डिजिटल स्वाक्षरीत खाते उतारे ९६ लाख ५६ हजार ५२६ डाउनलोड झाले,डिजिटल स्वाक्षरीत फेरफार २० लाख ३१ हजार ५२२ डाउनलोड झाले आणि डिजिटल स्वाक्षरीत प्रॉपर्टी कार्ड १५ लाख २१ हजार ७९२ डाउनलोड झाले.



दैनिक झुंजार जनता

४

गुरुवार दि.०३/०३/२०२५





द•ख•ल

## प्रेमसंबंधाच्या धमकीमुळे लग्न मोडले; आरोपीला अटक

**मिरजगाव :** प्रेमसंबंधाचा दावा करून तरुणीच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवत तिचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याने तिचे लग्न मोडल्याची घटना कर्जत येथे घडली. या प्रकरणी कर्जत पोलिसांनी सुनिल गोरख कदम (रा. बारडगाव दगडी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी (पीडित तरुणी) हिचे लग्न ठरले होते. मात्र, आरोपी सुनिल कदम याने तिच्या होणाऱ्या नवऱ्याला फोन करून तिच्यासोबत प्रेमसंबंध असल्याचे सांगितले. तसेच, तिचे फोटो इंस्टाग्रामवर पाठवले. यामुळे तिचे लग्न मोडले. याशिवाय, लग्नाचे आमिष दाखवून त्याने पीडितेच्या इच्छेविरुद्ध वारंवार शारीरिक संबंध ठेवले. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १ जानेवारी २०२४ते २५ मार्च २०२५ दरम्यान कर्जत येथील 'गुडलक हॉटेल अँड लॉज' येथे घडली. घटनेनंतर २९ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ४:४० वाजता तक्रार नोंदवण्यात आली.पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक दौलतराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोऱ्हाडे करत आहेत.

## काष्टी ग्रामपंचायतीच्या बाजारातील जनावर लिलावास हायकोर्टाची स्थगिती

श्रीगोंदा :- तालुक्यातील काष्टी ग्रामपंचायत कडून आज होत असणाऱ्या बाजारातील जनावर बाजाराच्या लिलावास हायकोर्टाची स्थगिती दिली असून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समिती आणि काष्टी ग्रामपंचायतचा चालू असलेल्या वाद आता शिगेला पोहचला असून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी बेकायदेशीर वसुली बंद करा नाहीतर बाजार दुसरीकडे हलवू असा इशारा देताच ग्रामपंचायत चे सरपंच साजन पाचपुते यांनी बाजार हलवून दाखवा असे आव्हान दिल्याने मोठ्या प्रमाणात वाद शिगेला पोहचला त्यातच उद्या बाजार समितीच्या मालकीच्या बाजारात येणाऱ्या जनावरांच्या प्रवेश कराबाबत काष्टी ग्रामपंचायत ने लिलाव ठेवला होता. यामध्ये काष्टी ग्रामपंचायतचा जनावरांच्या या बाजारात जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची प्रवेश तसेच पार्किंग प्रति जनावर ३० रु प्रमाणे वसुली करायचे हा घोटाळा गेली अनेक वर्षे चालू होता .त्यातून मोठे उत्पन्न मिळायचे मात्र अल्प प्रमाणात उत्पन्न ग्रामपंचायत मध्ये जमा करायचे अश्या अनेक तक्रारी कृषी उत्पन्न बाजार समिती कडे प्राप्त झाल्यावर त्या होणाऱ्या निलावास कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने औरंगाबाद उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते .त्यावर सुनावणी घेत न्यायायल्याने होणाऱ्या निलावास स्थगिती देत कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे उद्याच्या बाजारात वसुली करण्यास ग्रामपंचायतला मोठी अडचण निर्माण झाली आहे.

# 'त्या' आदेशाला बचत गटाच्या महिलांची केराची टोपली

**श्रीगोंदा:** ;- तालुक्यात उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोन्नती अभियान अंतर्गत बचत गटाच्या माध्यमातून लाखो रुपयाचा अपहार झाल्याची बाब निदर्शनास आल्यावर जिल्हा परिषदेकडून नोटिसा काढून सात दिवसात रक्कम भरण्यासाठी मुदत देण्यात आली होती, मात्र आजपर्यंत महिलांनी एकही रुपया भरला नसल्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला बचत गटाच्या महिलांची केराची टोपली दाखवली आहे असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही .श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी गटातील उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोन्नती अभियान अंतर्गत बचत गटाच्या माध्यमातून ८०लाख ६४हजार ४७२ अश्या लाखो रुपयांचा घोटाळा झाला मात्र अभियानाचे जिल्हा मॅनेजर सोमनाथ जगताप यांनी चौकशी केल्यावर त्यातील ३६लाख ६३हजार १७२ रकमेचा भरणा झाला तरीही यामध्ये अजून ४४०१३०० रकमेचा घोटाळा असल्याची बाब चौकशीत निदर्शनास आल्यावर घोटाळेबाज महिलांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी नोटीस काढून घोटाळ्यातील ४४०१३०० रक्कम भरण्यासाठी ७ दिवसाचा अवधी दिला होता अशी नोटीस त्यांनी २४ मार्च २५ रोजी काढली होती हि नोटीस महिलांना मिळून तब्बल ७ दिवस उलटले तरीही घोटाळ्यातील महिलांनी एकही दमडी भरलेली नाही. उलट महिलामध्ये गैरसमज पसरवून पैसे भरू नका असा सांगितले जात असल्याची चर्चा होताना दिसत आहे त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशाला महिलांनी केराची

### कायदेशीर गुन्हे दाखल होणार का?

टोपली दाखवली आहे त्यामुळे आता महिलांवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्याची प्रोसेस चालू झाली आहे त्यामुळे कोणत्याही क्षणी बचत गटातील महिलांसह ग्रामसंघ यांच्यासह बचत गट अध्यक्ष सचिव कोषाध्यक्ष याच्यावर गुन्हे दाखल होणार असल्याची माहिती अभियान जिल्हा मॅनेजर सोमनाथ जगताप यांनी बोलताना दिली आहे मात्र जिल्हा परिषदेकडून नोटिसा काढून सात दिवसात रक्कम भरण्यासाठी मुदत देण्यात आली होती मात्र आजपर्यंत घोटाळेबाज महिलांनी एकही रुपया भरला नसल्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला बचत गटाच्या महिलांची केराची टोपली दाखवली आहे असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही .बेलवंडी गटातील वसुलीस पात्र ग्रामसंघ तालुक्यातील बेलवंडी गटातील मढेवडगाव मधील ग्रामसंघ हिरकणी आणि कोहिनुर हंगेवाडी मधील सह्याद्री लोणी व्यंकनाथ मधील किरण ढोकराई मधील आशीर्वाद शिरसगाव बोडखा मधील प्रेरणा तसेच बेलवंडी बुद्रुक मधील ओम,राजनंदिनी, आर्य उत्पादक गट,तसेच वांगदरी मधील उत्कर्ष अश्या एकूण ७६ ग्रामसंघ वसुलीसाठी पात्र असून यांच्याकडून लाखो रुपयाची वसुली होणे बाकी असल्याची माहिती मिळाली आहे नोटिसा नंतर कारवाईच होणार ?तालुक्यातील बेलवंडी गटातील उमेद अंतर्गत येणाऱ्या बचत गटातील ग्रामसंघ अध्यक्ष सचिव याना पंचायत समितीच्या माध्यमातून नोटिसा काढल्या असून अद्याप पर्यंत एकही रुपयाची वसुली झाली नसल्यामुळे आता सर्वांना कायदेशीर कारवाईला जाण्याशिवाय पर्याय उरलेला नाही असे सज्ञान नागरिकांचे मत आहे

## भक्तीचा मार्ग सत्य आणि समतेकडे घेऊन जातो : बाळासाहेब गव्हाळ

**शेवगाव :**, भक्तीचा मार्ग हा सोपा असून तो माणसाला सत्य आणि समतेच्या दिशेने नेतो,'' असे प्रतिपादन . बाळासाहेब महाराज गव्हाळ यांनी केले. सालवडगाव हनुमान वस्ती येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशीच्या किर्तन सेवेत ते बोलत होते.यावेळी संत तुकाराम महाराजांच्या ''आम्ही न देखो अवगुणां'' या अभंगाचा संदर्भ देत त्यांनी समाजाला एकात्मतेचा संदेश दिला. ''प्रत्येक व्यक्तीमध्ये ईश्वराचे अस्तित्व आहे. त्यामुळे कोणाच्याही दोषांकडे पाहू नका. प्रत्येकामध्ये चांगुलपणा असतो, फक्त तो ओळखण्याची दृष्टी हवी,'' असे त्यांनी सांगितले.गव्हाळ महाराज पुढे म्हणाले, ''पाषाण, धातू किंवा निर्जीव वस्तूंमध्ये भक्ती नसते, पण भक्ताच्या श्रद्धेमुळे त्या वस्तूंना देवत्व प्राप्त होते. जसे विषही अमृत होऊ शकते, तसेच भक्तीमुळे कोणतेही रूप पावन होऊ शकते.''समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी भक्ती आवश्यकआजच्या काळात जात, धर्म, भाषा यावरून समाजात भेदभाव वाढत आहे. अशा वेळी संत तुकाराम महाराजांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. ''जर आपण एकमेकांच्या दोषांपेक्षा त्यांच्यातील चांगुलपणाकडे पाहिले, तर समाजात प्रेम आणि बंधुत्व निर्माण होईल,'' असे गव्हाळ महाराजांनी सांगितले.''संत तुकाराम महाराजांचा अभंग केवळ भक्तीपर नाही, तर तो सामाजिक ऐक्य आणि सद्भावनेचा संदेश देतो. त्यामुळे तरुणांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन समाजात सकारात्मकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा,'' असे आवाहनही त्यांनी केले.



## शालेय अभ्यासक्रमात आहिल्याबाई ऐवजी आहिल्यादेवी उल्लेख करावा : पांडुरंग माने

**जामखेड :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे संपूर्ण हिंदुस्थानचे प्रेरणास्थान आहेत. कुशल प्रशासक व आदर्श न्याय पद्धतीच्या जोरावर त्यांनी रयतेच्या जगण्याचा खऱ्या अर्थाने राम आणला. शासनाच्या विविध कार्यक्रमातही आहिल्यादेवी नावाचा उल्लेख आहे मात्र महाराष्ट्रात शालेय अभ्यासक्रमात आहिल्याबाई असे नाव झाले आहे, त्यामुळे येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असा उल्लेख करण्याची मागणी महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समितीचे सदस्य पांडुरंग माने यांनी केली आहे. यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, हिंदुस्तान परकिय राजवटीमुळे शंत खंडित झाला होता. त्यास अखंडित ठेवण्याचा काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले. या खंडप्राय देशाच्या प्रत्येक भौगोलिक स्थानावर त्यांनी अनेक मंदिरांची निर्मिती केली व शेकडो मंदिरे जनार्धन जीर्णोद्धार केला व हिंदू संस्कृतीला पुनर्जीवित करत भारत भूमीला आत्मसन्मान मिळवून दिला.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण हिंदुस्थानला नवी दिशा दिली. देशाला अखंडित ठेवले.अशा या महान प्रेरणादायी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे महान व प्रेरणादायी आहे. शासनाच्या विविध



कार्यक्रमातही राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असा उल्लेख करण्यात येतो मात्र शालेय अभ्यासक्रमात आहिल्याबाई असा उल्लेख करण्यात आला होता,त्यामुळे येणाऱ्या शालेय सत्रातील अभ्यासक्रमात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असा उल्लेख करण्याची मागणी महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समितीचे सदस्य पांडुरंग माने यांनी केली आहे यावेळी ओबीसी समाज संघटनेचे उपाध्यक्ष शिवकुमार डोंगरे, दशरथ कोळेकर, पप्पू काशिद आदींसह धनगर समाज बांधव उपस्थित होते.

## ढगाळ वातावरणाबरोबरच अवकाळी पावसाची लहर, कांदा उत्पादक चिंतेत

**लिंपणगाव :-** गेल्या तीन दिवसापासून सर्वत्र ढगाळ वातावरण व रात्री अवकाळी पावसाची लहर त्यामुळे कांदा उत्पादकांना मोठी धास्ती निर्माण झाल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार कांदा पिक हे काढणीला आलेले असतानाच गेल्या तीन दिवसापासून ढगाळ व दमट वातावरण तयार होताना दिसत आहे. तर रात्री अचानक विजेच्या कडकडाट होऊन पावसाची रिपरिप सुरू होत आहे. अशा परिस्थितीत काढनी करून ठेवलेला कांदा झाकण्यासाठी शेतकऱ्यांची रात्रभर धांदल उडताना दिसत आहे. एकीकडे कमी पाण्यावर कांदा पीक शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टातून जगविले. मोठ्या प्रमाणावर कांद्याच्या पोषणासाठी विविध प्रकारच्या फवारणी औषधे खते बियाणे खरेदी केले. शेवटी मात्र अवकाळी पावसाने या पिकांना घेरले आहे. दरम्यान हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार अवकाळी पावसाचा अंदाज देखील तंतोतंत खरा ठरताना दिसत आहे. शेतकऱ्यांनी अवकाळी पाऊस येण्यापूर्वीच कांद्याची काढणी करून कांदा सुरक्षित वखारी मध्ये ठेवण्यासाठी धडपड सुरू केल्याचे दिसते. मात्र गेल्या तीन दिवसापासून वातावरणात मोठा बदल होताना दिसत आहे. तस तसे कांदा उत्पादकांच्या काळजाचे ठोके मात्र वाढले जात आहेत. सध्या शेतकऱ्यांनी ऊस पिक ऐवजी कांदा पिकाकडे जास्त कल दिलेला आहे. कारण कांदा पिक हे नगदी पीक म्हणून ओळखले जाते. साधारणतः साडेतीन ते चार महिन्यांमध्ये हे पीक शेतकऱ्यांना हाती लागते. परंतु निसर्ग मात्र आपली चाल काही सोडायला तयार नाही. अगदी हाता तोंडाशी आलेला कांदा पिक हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार अवकाळी पावसामुळे हातचा जातो की काय? अशी शक्यता शेतकऱ्यांमधून वर्तवली जात आहे. शेतकऱ्यांचे म्हणण्यानुसार सध्या वातावरणात मोठा बदल झालेला आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून ढगाळ व दमट वातावरण तयार होत आहे. या ढगाळ वातावरणाचा काढनिला आलेला गहू देखील या वातावरणामुळे धोक्यात आहे. असे या परिस्थितीत शेतकऱ्यांची सध्या धांदल सुरू झाल्याचे दिसून येत आहे. एकीकडे रब्बी हंगामातील कुकडीच्या एका आवर्तनाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणले. पाणी उशाला मात्र कोरड घशाला अशा परिस्थितीत रब्बी हंगामातील पिके शेतकऱ्यांनी कशीबशी हाती घेण्याचा प्रयत्न केला. या कुकडी आवर्तनाच्या एका आवर्तनाअभावी रब्बी हंगामात पिकातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात देखील मोठी घट झाल्याचे शेतकरी सांगतात.

## नियोजनबद्ध अभ्यास केल्यास प्रशासकीय अधिकारी तयार होतील : डॉ. लाहोटी

**ढोरजळगांव :-** उचल फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक करत येथील विद्यार्थ्यांनी योग्य व नियोजनबद्ध अभ्यास केल्यास भावी डॉक्टर, इंजिनिअर, प्रशासकीय अधिकारी तयार होतील असा आशावाद डॉ. शुभम लाहोटी यांनी व्यक्त केला.येथील उचल फाउंडेशन परिवारातील सदस्य भाऊसाहेब शिंदे व मीनाक्षी शिंदे यांच्या कन्या कु. डॉ. भक्ती व डॉ. आशिष लाहोटी यांचे सुपुत्र डॉ. शुभम हे नुकतीच वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस ही परीक्षा उत्तीर्ण झाले. त्याबद्दल त्यांचा गुणगौरव सोहळा सोहळा उचल फाउंडेशन येथील अरुणोदय भवन या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युसुफभाई पठाण होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सुनील आढाव, डॉ. मनिषा लड्ढा, वसुधा सावरकर, भागनाथ काटे ,भाऊसाहेब शिंदे, डॉ. आशिष लाहोटी, सचिन खेडकर उपस्थित होते. डॉ. भक्ती शिंदे म्हणाल्या शिक्षक आई-वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक बांधिलकी जपत वैद्यकीय सेवा देऊ. तसेच उचल फाउंडेशन मधील विद्यार्थ्यांच्या मदत व मार्गदर्शनासाठी सदैव तत्पर राहु. यावेळी प्रा. आढाव यांनी या दोन्ही डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या व संस्थेच्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. संजय लड्ढा यांनी केले तर मिनाक्षी शिंदे यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास वैभव भोर, अभय पालवे, वनिता डाके, श्रावणी आव्हाड सह तेजस्वी गृप चे सर्व सदस्य उपस्थित होते.



# महात्मा फुलेंच्या जयघोषाने दुमदुमले अहिल्यानगर

**अहिल्यानगर :** देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत अहिल्यानगर राज्यस्तरीय भिडेवाडा कविसंमेलन नुकतेच क्लेरा ब्रूस हायस्कुल फॉर गर्ल्स या शाळेच्या सभागृहात संपन्न झाले. क्लेरा ब्रूस या ट्रेनिंग सेंटरमध्ये साक्षात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि फातिमाबी शेख यांनी शिकविण्याचे प्रशिक्षण घेऊन नंतर पुण्यातील भिडेवाडयात क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या पुढाकाराने देशातील पहिली मुलींची शाळा सुरु केली होती म्हणून क्लेरा ब्रूस या ट्रेनिंग सेंटरला ऐतिहासिक महत्व आहे.महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून फुलेप्रेमी कवींनी उपस्थित राहून देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा या विषयावर दर्जेदार अर्थपूर्ण समाजजागृती व प्रबोधन करणाऱ्या कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. देवेंद्र गावंडे यांच्या लढली ती वाघिणीवाणी या सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर सादर केलेल्या रचनेने रसिकांची मने जिंकली. बीडचे कवी महादेव लांडगे यांनी आद्यक्रांतिगुरू वस्ताद लहुजी साळवे यांच्यावर अप्रतिम रचना सादर केली. सावित्रीची सावली ठरली माय फातिमा या विजय वडवेराव यांच्या कवितेने प्रत्येक काळजाचा ठाव घेतला.या अभियानांतर्गतच संविधानजागर अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या माजलगाव बीडच्या फुलेप्रेमी संविधान दूतदुर्गा देशमाने राऊत




यांना सावित्रीमाई फुलेंची वेशभूषा असलेले हिरवे लुगडे भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सातारा येथील फुलेप्रेमी संविधान दूत विद्या मलवडकर यांना संविधान दूत बॅच देऊन सन्मानित करण्यात आले.

साक्री धुळे येथील फुलेप्रेमी संविधान दूत क्रांती वेंदे यांचा वाढदिवसही यावेळी सर्व फुलेप्रेमींनी उत्साहात साजरा केला. क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाच्या दैदिप्यमान इतिहासाला उजाळा मिळावा तसेच फुले दांपत्याने सुरु केलेल्या देशातील मुलींच्या पहिल्या शाळेचा इतिहास जतन व्हावा, जनमाणसात, पुढील पिढ्या पर्यंत पोहोचावा यासाठी या काव्यजागर अभियानांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात जिल्ह्यास्तरीय भिडे वाडा कविसंमेलन करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे या अभियानाचे जनक आयोजक फुलेप्रेमी संविधान दूत भिडेवाडा कार विजय वडवेराव यांनी सांगितले.या कविसंमेलनाचे वेगळेपण म्हणजे सभागृहात उपस्थित असणारे सर्वच फुलेप्रेमी कविसंमेलनाचे अध्यक्ष होते. सर्वांसाठी चहा, नाष्टा, उत्कृष्ट जेवण या सुविधा मोफत पुरवण्यात आल्या. कवितेच्या सादरीकरणानंतर सर्व फुलेप्रेमी कवींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. फुलेप्रेमी संविधान दूत सरिता कलढोणे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. फुलेप्रेमी प्रतिमा साळुंके यांनी स्वागतासाठी अप्रतिम रांगोळी काढली. क्लेरा ब्रूस शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच संस्थेच्या चेअरमन डॉ. विजया जाधव यांनी सर्व प्रकारची मदत केली. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अॅड.अण्णासाहेब भागवत, प्रतिभा किर्तीकर्वे, सरिता कलढोणे,अरविंद बनसोडे, दत्तात्रय भोसले, क्रांती वेंदे, सिद्धार्थ पानपाटील,सुनिता नाईक, वनिता जाधव, बबन चव्हाण या फुलेप्रेमींनी विशेष सहकार्य केले.

## श्री गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेला ४ कोटी ४५ लाख रुपयांचा नफा

### आर्थिक वर्षामध्ये ठेवींमध्ये ११ कोटींची वाढ

**टाकळी ढोकेश्वर :-** श्री गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेला दि.३१ मार्च अखेर ४ कोटी ४५ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला असून संस्थेच्या ठेवीमध्ये ११ कोटी ०६ लाख रुपयांची वाढ झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन श्री.बा.ठ. झावरे यांनी दिली.लवकरच संस्था १५० कोटी रुपयांच्या ठेवीचा टप्पा पार करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या ८शाखांच्या माध्यमातून व १४ वर्षाच्या वाटचालीमध्ये सभासदांना अत्याधुनिक बँकिंग सुविधा तसेच विविध प्रकारच्या ग्राहकभिमुख योजनांच्या माध्यमातून सेवा देण्याचा प्रयत्न संस्थेने केलेला आहे. ३१ मार्च या आर्थिक वर्षात संस्थेकडे १३२ कोटी ६१ लाख रुपयांच्या ठेवी असून कर्ज वाटप ११४ कोटी ८९ लाख रुपये इतके आहे.संस्थेने विविध बँकांमध्ये ३० कोटी ०६ लाख रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय २४७ कोटी ५० लाख रुपये इतका झालेला आहे. राखीव व इतर निधी १० कोटी २१ लाख रुपये,तर संस्थेची वार्षिक उलाढाल १ हजार ७५ कोटी रुपयांची झालेली आहे. संस्थेला थकबाकीचे प्रमाण अत्यल्प राखण्यास यश आलेले आहे.संस्थेने १४ वर्षे सातत्याने नफा मिळवताना ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त झालेला आहे. संस्थेने नवीन व प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे संस्थेची प्रगतीची घौडदौड चालु आहे. खातेदारांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतून रक्कम काढता यावी यासाठी संस्थेने कोअर बँकिंग प्रणालीचा स्वीकार केला आहे. संचालक मंडळाने नेहमीच सभासदांचे हित जपण्याचा प्रयत्न केलेला असून सर्व ग्राहकांनी व सभासदांनी संस्थेप्रती दाखविलेल्या विश्वासास कधीही तडा जाऊ न देता सर्व संचालक मंडळ ,ठेवीदार,कर्जदार,सर्वसामान्य ग्राहक,हितचिंतक व कर्मचारी वर्ग यांच्या पाठबळावर संस्था प्रगतीपथावर नेण्याचा प्रामाणिक व विश्वासास पात्र राहूनच प्रयत्न भविष्यकाळातही करणार असल्याचे अध्यक्ष बा.ठ.झावरे यांनी सांगितले.



## मौजे-शिंदोळ येथे कन्या दिन उत्साहात साजरा!

सोयगाव तालुका...
प्रतिनिधी दिलीप मोरे....

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मुला-मुलींच्या जन्मदराचे प्रमाण हे चिंताजनक असल्याने,मुलींचा जन्मदर वाढविणे आवश्यक आहे.त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात,छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या "त्री सुत्री" कार्यक्रमांतर्गत "PCPNDT" कायद्याच्या प्रसार/प्रचारासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावयास त्यांच्या पत्राद्वारे सांगितले होते. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,शिंदोळ येथे ग्रामपंचायत कार्यालय शिंदोळ यांच्या संयुक्त विद्यमाने कन्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित विद्यार्थ्यींनींना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत रूजू असलेले ग्रामपंचायत ट्रेनी जगदीश सोनवणे यांनी सर्व उपस्थित विद्यार्थी,विद्यार्थिनी व ग्रामस्थांना स्त्री-पुरूष समानतेची शपथ दिली, ग्रामसेवक सुशिल मोरे यांनी थोडक्यात या कार्यक्रमा मागची पार्श्वभूमी सांगितली व मुख्याध्यापक सतिश महाजन यांनी सर्वांचे आभारप्रदर्शन करत कार्यक्रमाची सांगता केली. याप्रसंगी ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका,मदतनीस,आशा स्वयंसेविका,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद,माता पालक व ग्रामस्थांची उपस्थिती होती.




## श्रीक्षेत्र गोळवाडी ते शिर्डी पदयात्रा दिंडी... साई पालखी सोहळा...

वैजापूर प्रतिनिधी अर्जुन शिंदे.

श्रीक्षेत्र गोळवाडी ते शिर्डी पदयात्रा दिंडी साई पालखी सोहळा सालाबादाप्रमाणे याही वर्षी दि.५ एप्रिल २०२५ रोजी (शनिवार) सकाळी ठीक ७ वाजता दक्षिणमुखी हनुमान मंदिर व ओमकारेश्वर महादेव मंदिर येथून दिंडीचे प्रस्थान होणार आहे. तरी श्रीक्षेत्र गोळवाडी व रामनगर येथील साई भक्तांनी शनिवारी रोजी सकाळी ठीक सात वाजता दक्षिण मुखी हनुमान मंदिर ओमकारेश्वर महादेव मंदिराजवळ उपस्थित राहणे. ही सर्व साई भक्तांना विनंती आहे. श्री क्षेत्र गोळवाडी ते साईबाबा पदयात्रा दिंडी सोहळ्याचे आयोजन शैलेश भैय्या सुराशे मित्र मंडळ गोळवाडी/रामनगर व गावातील ग्रामस्थांनी केले आहे. तरी गावातील जास्तीत जास्त साई भक्तांनी पदयात्रा दिंडी सोहळ्यात हजर राहणे ही विनंती आयोजकांनी केली आहे.




Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता**, कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**